अखिल भारतीय मराठी
नाट्य परिषदेचे

**८४ वे
अखिल
भारतीय
मराठी
नाट्यसंमेलन,
कऱ्हाड
२००४**

३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २००४

# अध्यक्षीय भाषण



## शं. ना. नवरे

लोकसभेचे अध्यक्ष माननीय माननीय मनोहरपंत जोशी, मुख्यमंत्री माननीय सुशीलकुमारजी शिंदे, सांस्कृतिक मंत्री मा. अशोक चव्हाण, मावळत्या संमेलनाध्यक्षा श्रीमती जयमाला शिलेदार, विशेष अतिथी ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, स्वागताध्यक्ष श्री. जयसिंग चव्हाण, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी, परिषदेचे सर्व पदाधिकारी, संमेलनाच्या संयोजन संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उपस्थित रंगकर्मी, नाट्य रसिकहो–

पूर्वी कोल्हापूरला जाताना कऱ्हाड शहरातून जावं लागे. माझ्या आठवणीप्रमाणं मध्ये एक लोखंडी पूल लागायचा. कऱ्हाडबद्दल मी वाचलं होतं, ऐकलं होतं. कृष्णा आणि कोयना या दोन पवित्र नद्यांच्या प्रितीसंगमावर वसलेलं हे प्राचीन शहर आहे, या दोन नद्या महाबळेश्वराच्या स्थानानजिक एकाच ठिकाणी उगम पावून विरुद्ध दिशांना वाहत जातात, कऱ्हाडजवळ कोयना नदी कृष्णा नदीला सामोरी जाते. दोन्ही नद्या पुन्हा एकमेकींना प्रेमानं भेटतात. कोयना कृष्णारुप होते. असा प्रितीसंगम जगात कुठंही नाही. कऱ्हाडला 'दक्षिण काशी' मानतात. इत्यादी गोष्टी मला माहित होत्या. संत रामदासांचं वास्तव्य याच परिसरातलं. सांस्कृतिक वारसा लाभलेलं हे कऱ्हाड शहर [illegible]तराव चव्हाणांच्या वास्तव्यामुळं पुन्हा प्रकाशात आलं. कऱ्हाडची उद्योगनगरी बनविण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता. ते राजकारणी होते, डोळस आणि दूरदृष्टीचे, जोडीला ते चिकित्सक विचारवंत, जाणकार वाचक आणि लेखक होते. राजकारणात पडूनही त्यांनी रसिकतेची फारकत घेतली नव्हती. विद्वानांची मांदियाळी सदैव त्यांच्या आसपास असायची. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशांच्या विश्वकोष निर्मितीला यशवंतरावांचं सर्वथैव सहकार्य लाभलं होतं. मराठी नाटकांवरचा कर माफ करण्यात यशवंतरावांचा सिंहाचा वाटा होता. महाराष्ट्राला सार्थ अभिमान वाटावा असा हा पूर्ण नेता याच कऱ्हाड शहरानं दिला.

तर सांगायचं म्हणजे या कौतुकाच्या शहरावरून जाताना अनेकदा माझ्या मनात यायचं या गावाला उतरावं, एक लहानशी चक्कर मारून गावाची निदान तोंडओळख करून घ्यावी. कसं कोण जाणे, पण ते कधीच नाही जमलं. जाता जाता गाव बघून त्याची ओळख होत नाही. ओळख व्हायला त्या गावाला पाय लागावे लागतात.

एक आठवण झाली ती सांगतो...... आम्हा नवरे कुटुंबियांना भाषणापेक्षा संभाषण करायला आवडतं. आणि संभाषणात सुचतील त्या हकिकती, गोष्टी सांगायला आवडतात.

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. नाशिकहून बसनं असा सकाळीच भिवंडीला उतरलो. रिक्शा करून कल्याण स्टेशनवर जावं आणि तिथून रेल्वेनं डोंबिवलीला, असं ठरवलं. एक रिकामी रिक्शा दिसली. रिक्शावाला चविष्टपणे चहाचा आस्वाद घेत होता. तो कल्याणला यायला तयार झाला. म्हणाला, 'कल्याणला पोचायची घाई नाहीयेना? मी जरा आरामात रिक्शा चालवतो.'

रस्त्यात तो म्हणाला, 'प्रवासी इकडून तिकडे जाण्याची घाई का करतात? प्रवासात इकडे तिकडे पहावं, एखाद्या सुंदर ठिकाणी थांबावं. वेळ असेल तर एखाद्या बोलावणाऱ्या वळणावर रस्ता सोडून वळावं सुद्धा. वेड्या [illegible]त आपण जगण्यातल्या साध्या सोप्या आनंदाला मुकत असतो..... सदैव कारनं जाणाऱ्या माणसाला मित्र भेटत नाही. रस्त्यानं चालणाऱ्याला मित्र भेटतात.'

म्हणजे मी कऱ्हाडला कधी उतरलो नाही हे चुकलंच होतं माझं. गावाची ओळख झाली नाही. कुणा अनोळखी कऱ्हाडकराची दोन शब्दांची देवाण घेवाण झाली नाही.

आज रंगदेवतेनं मला खेचून इथं आणलंय. मनाला आवडलेलं गाव भेटतंय. तिथली माणसं भेटताहेत, त्यांचं अगत्य लाभतंय, त्या अगत्यातलं पुन्हा येण्याचं निमंत्रण जाणवतंय. मी आनंदात आहे. रंगदेवतेचं ऋण मानावं तेवढं कमीच आहे.

मी इथं आलोय ८४व्या नाट्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून. असे सन्मान मला दुसऱ्यांना मिळालेले आवडतात. स्वत:ला मिळाल्याचे मी स्वप्नातही आणत नाही. मी तसा तटस्थ वृत्तीचा आहे. अति जवळच्या अशा नाट्यकर्मींनी माझ्यावर आग्रहाचा मारा केला. मला 'नाही' म्हणण्याची ताकदही उरली नाही.

मला 'नाही' म्हणता येत नाही, हा माझा दुबळेपणा आहे. माझा हा दुबळेपणा जाण्यासाठी माझ्या एका परममित्रानं मला एक पुस्तक वाचायला सांगितलं. How to say "no" and be happy असे त्या पुस्तकाचे

नाव होतं. मी मुंबईच्या एका मोठ्या पुस्तकांच्या दुकानात जाऊन ते पुस्तक मागवलं. पुस्तकवाल्यानं अर्धा एक तास शोधाशोध केली आणि शेवटी मला म्हटलं, 'माफ करा, या पुस्तकाची एकही प्रत शिल्लक नाही. पण तुम्हाला मी एक दुसरं पुस्तक सुचवतो. तितकंच चांगलं. 'How to say 'Yes' देऊ काढून' आणि त्यालाही मी 'नाही' म्हणू शकलो नाही. म्हणजे बघा,

.... तर असा योगायोगानं मी आपल्यापुढं संमेलनाध्यक्ष म्हणून आलो आहे.

नाट्य संमेलनाचा थोडासा प्रारंभीचा इतिहास मी कल्याणनजिकचा, डोंबिवलीकर म्हणून अभिमानानं सांगणार आहे. पुण्याचे एक नाट्य उपासक अनंत वामन बर्वे यांनी १९०५ साली पहिलं मराठी नाट्य संमेलन भरवलं. केवळ व्यावसायिक नाटक मंडळींचं. पुण्याच्या किर्लोस्कर नाट्यगृहात. त्या संमेलनाचं यजमानपद 'राजापूरकर संगीत नाटक मंडळी'नं स्वीकारलं होतं. या नाटक कंपनीचे मालक बाबाजीराव राणे. त्यांनी लिहिलेलं 'संत तुकाराम' हे नाटक तेव्हा विलक्षण लोकप्रिय झालं होतं. ते त्यात तुकारामाची भूमिका करत. या बाबाजीराव राण्यांनी स्वतःच्या पैशातून आमच्या कल्याणला 'संत तुकाराम' नावाचं नाट्यगृह बांधलं होतं. नाटकवाल्यानं नाट्यगृह बांधणं ही बहुधा पहिलीच घटना असावी. नाट्य संकुलाची कल्पना तेव्हा अस्तित्वात असती तर बाबाजीरावांनी तेही ब[illegible] असतं असं मला वाटतं. तुम्हालाही वाटलं असेल. आपल्या साऱ्यांच्या या वाटण्यातून आपण बाबाजीरावांच्या आत्म्याला प्रार्थना करू की आमचं नाट्य संकुलाचं स्वप्न या वर्षभरातच साकार व्हावं, रंगदेवतेनं कल्याण तालुक्यातल्या मला यंदा इथं आणण्यामागं हा तर हेतू नसेल?

१९०५च्या पहिल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते दादासाहेब खापर्डे. लोकमान्य टिळकांचे सहकारी. कालांतरानं हे संमेलन 'अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन' या नावानं दर वर्षी भरू लागलं. काकासाहेब खाडीलकर, न. चिं. केळकर, आचार्य अत्रे, चिंतामणराव कोल्हटकर, पु. ल. देशपांडे, नानासाहेब फाटक, दुर्गाबाई खोटे आदी अनेक धुरिणांनी हे अध्यक्षपद भूषवलं आहे. आजवरच्या सर्व अध्यक्षांना मी नम्रपणे वंदन करतो.

सुरुवातीला फक्त व्यावसायिकांचे हे संमेलन होतं. आता व्यावसायिक, हौशी, बालनाट्य वगैरे सर्व प्रवाह या विशाल नाट्य गंगेत सामील झाले आहेत. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही यच्चयावत् रंगकर्मींची मातृसंस्था झाली आहे. मातृसंस्थेच्या या वार्षिक संमेलनाला नाट्यगंगेत सुस्नात होण्यासाठी जमलेल्या सर्व रंगकर्मीचं आणि नाट्यरसिकांचं मी मनः पूर्वक स्वागत करतो, वंदन करतो.

१८४३ साली जन्मलेलं मराठी नाटक जन्मापासूनच लोकप्रिय झालं. रसिकांनी त्याला उत्तेजन दिलं. उत्तेजनामुळं त्यात वेळोवेळी विविध बदल होत गेले.१८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'संगीत शाकुंतल' रंगभूमीवर आणलं आणि मराठी नाटकानं सुरेल तेजस्वी रुप धारण केलं. संगीत नाटकानं पुढील पन्नास वर्षं रंगभूमीवर अधिराज्य गाजवलं. संवाद बोलताना संगीतात जाणं आणि पुन्हा लीलया संवादात येणं हे एक विलक्षण, अद्भूत रसायन आपल्या मराठी नाटकानंच जगाला दिलं.

याच काळात इंग्रजी नाटकांच्या अभ्यासामुळं गद्य नाटकांची परंपराही फोफावू लागली. रंगदेवतेच्या दरबारा[illegible] खजिना गुणी रत्नांनी ओसंडून वाहू लागला. देवल, खाडीलकर, किर्लोस्कर, गडकरी, बालगंधर्व, मास्टर दीनानाथ, केशवराव भोसले, गणपतराव जोशी, गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, भास्करबुवा बखले, वझेबुवा, मास्टर कृष्णराव, गोविंदराव टेंबे..... किती म्हणून नावं घ्यावीत?

१९३१ साली सिनेमा बोलू लागला. मराठी प्रेक्षकांना करमणूकीचं एक वेगळं दालन खुलं झालं. परिणामी सिंहासनावर बसलेल्या मराठी नाटकाच्या नशिबी वीसएक वर्षांचा वनवास आला. तरीही या वनवासाच्या काळात 'नाट्यमन्वंतर', बाल-मोहन नाटक मंडळी, मो. ग. रांगणेकरांची 'नाट्यनिकेतन' इत्यादी संस्थांनी मराठी नाटकाचा अंकूर जीवाविशेष जपला. रांगणेकरांची कालानुरुप बेतलेली सुटसुटीत, प्रमाणबद्ध संगीत असलेली नाटकं जुन्या आणि नव्या नाटकांना सांधणारा एक पूल ठरला !

सिनेमा-नाटकाच्या रस्सीखेचीत नेमक्या वेळी एक बलदंड, अफाट जिद्दीचे आणि बुद्धिमत्तेचे सुशिक्षित सद्गृहस्थ नाटकाच्या मदतीला धावले. नाटक हे मराठी माणसाच्या मर्मबंधात आहे याची त्यांना जाणीव होती. हे सद्गृहस्थ म्हणजे मुंबई साहित्य संघाचे डॉ. अ. ना. भालेराव. प्रत्येक मराठी रंगकर्मीनं, प्रत्येक मराठी नाट्य

रसिकानं शतजन्म त्यांच्या ऋणात रहावं असं त्यांचं कर्तृत्व होतं.

१९४४ साली उत्कृष्ट निर्मितीमूल्यं असलेला भव्य नाट्य महोत्सव डॉक्टरांनी सुरू केला. जुन्या नाटककारांच्या कलाकृतींना, जुन्या कलाकारांना, संगीतकारांना या महोत्सवानं उजाळा मिळाला. नव्या पिढीला जुन्या नाट्य वैभवाचं दर्शन घडलं. जुन्या नाटककारांनी हाताळलेल्या पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक आदी विषयांची कल्पना आली. गतकाळातील भाषा वैभव, अभिनयातील संपन्नता आणि संगीतातील जादू-ई-श्रीमंती प्रत्ययाला आली. या महोत्सवाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि त्यांच्यात नाटकाची गोडी नव्यानं उफाळून आली. या नंतरच्या नाट्य महोत्सवांनी जुन्या नाट्यकर्मींबरोबरच नवीन नाट्यकर्मी प्रेक्षकांसमोर आले. नाट्य व्यवसायाचे अक्षरश: पुनरुज्जीवन झाले. या नाट्य महोत्सवातून स्फूर्ती घेऊन नाट्य दिंडीत संपूर्ण महाराष्ट्रासह गोव्यातील तरुण पिढी सामील झाली.

भारतीय विद्या भवनच्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा, राज्य नाट्य स्पर्धा, पार्श्वनाथ आळतेकर नाट्य स्पर्धा, पुण्याची पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा यात तरुण पिढी हिरीरीनं भाग घेऊ लागली. रंगायन, पी. ए., आय. एन. टी., महाराष्ट्र कलोपासक, रंजन कला मंदिर, अविष्कार इत्यादी प्रायोगिक नाट्य संस्था जन्माला आल्या. आय. एन. टी.च्या माध्यमातून आत्माराम भेंडे यांनी 'फार्स' हा नवा नाट्यप्रकार रंगभूमीला दिला. भालचंद्र पेंढारकरांनी आपल्या 'ललित कलादर्श' संस्थेचं पुनरुज्जीवन केलं. नाट्यकला सर्वांगानं बहरू लागली. गिरणगावात सुद्धा नाटकांनी नवीन विषय हाताळले. नवीन तंत्रं हस्तगत केली. रंगभूमीला चिं. य. मराठे, वि. वा. शिरवाडकर, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, बाळ कोल्हटकर, मधुसूदन कालेलकर, वसंत सबनीस, विद्याधर गोखले, विजय तेंडूलकर, रत्नाकर मतकरी, पुरुषोत्तम दारव्हेकर, मधुकर तोडरमल, नाना जोग इत्यादी नाटककार लाभले. आत्माराम भेंडे, भालबा केळकर, विजया मेहता, दामू केंकरे, पुरुषोत्तम दारव्हेकर, मधुकर तोडरमल, नंदकुमार रावते यांच्या सारखे दिग्दर्शक, दाजी भाटवडेकर, अरविंद देशपांडे, डॉ. काशिनाथ घाणेकर, जब्बार पटेल, डॉ. श्रीराम लागू, डॉ. मोहन आगाशे, राजा नातू, सुधा आणि ललिता आमोणकर, बबन प्रभू यांच्या सारखे कलावंत, श्याम आडारकर, रघुवीर तळाशीलकर, आनंद पै, राम शितूत, श्रीधर राजगुरु यांच्या सारखे कल्पक नेपथ्यकार लाभले. या ताज्या दमाच्या रंगकर्मींनी मराठी रंगभूमीच्या कक्षा रुंदावल्या आणि तिला आशयघनही केलं. देवलांच्या शारदा नाटकानं मराठी नाटक प्रथमत: समाजाभिमुख केलं. अगदी अलिकडच्या काळात तीच परंपरा तेंडूलकरांच्या 'कमला' आणि 'कन्यादान' या नाटकांनी, मतकरींच्या 'लोककथा ७७' या नाटकानं जयवंत दळवींच्या 'पर्याय', 'पुरुष' या नाटकांनी, प्रशांत दळवींच्या 'चारचौघी' नाटकानं, अभिराम भडकमकरांच्या 'देहभान' नाटकानं चालवली. 'कीचकवध', 'रणदुंदुभी', 'संन्यस्त खड्ग' या जुन्या नाटकातलं राजकीय परिस्थितीचं भान अलिकडच्या काळात विजय तेंडूलकर, जयवंत दळवी, गो. पु. देशपांडे, शआफतखान यांच्याही नाटकानी राखलं. मराठी प्रेक्षकाला मनोरंजनाबरोबर सदैव सतर्क आणि उन्नत करण्याचं काम मराठी नाटकानं केलं आहे.

नगर जिल्ह्यातले खासदार यशवंतराव गडाख यांचं एक अप्रतिम असं आत्मचरित्र प्रसिद्ध झालंय. 'अर्धविराम' नावाचं. त्यात त्यांचं एक पत्र आहे. घरात नव्यानं आलेल्या सुनेला लिहिलेलं. त्यात त्यांनी म्हटलंय, आज तुला इथं जे सर्व ऐश्वर्य दिसतंय ते असं पूर्वी नव्हतं. आम्हा सर्वांना अत्यंत गरीबीतून आणि कष्टातून हे दिवस काढावे लागले आहेत. तेव्हा ज्या घराण्यात तुला आता सर्व आयुष्य काढायचं आहे, त्या घराण्याचा इतिहास तुला माहित पाहिजे, तो तुला मार्गदर्शक ठरेल!

मित्रहो, मी नाटकाचा जो धावता इतिहास सांगितला, त्या मागलं कारण हेच आहे! इतिहास सांगताना विस्तारभयास्तव काही नावांचा उल्लेख राहीला असेल याची मला जाणीव आहे. त्याबद्दल गैरसमज करून घेऊ नये.

नाटकाच्या शाळेत बबन प्रभूनं माझं नाव घातलं. पन्नासेक वर्षांपूर्वी, ही शाळा भरायची आत्माराम भेंडेंच्या घरी. बहुधा शनिवारी दुपारी. शाळेत सगळेच शिक्षक, सगळेच विद्यार्थी, शाळेची वेळ ठरलेली नाही. हजेरी नाही. दोन माणसं जमली की शाळा चालू. दांडी मारायचं कोणाच्या मनातही यायचं नाही. उलट पुढला शनिवार केव्हा येतो याचीच ओढ. या शाळेत जमणारी मंडळी म्हणजे नाटकवेडी मंडळी. बबन प्रभू, रमेश चौधरी, आत्माराम भेंडे, आशाबाई भेंडे नंतरच्या काळात कल्पक नेपथ्यकार म्हणून नावाजले गेलेले शाम आडारकर वगैरे. कुणी कुणाला

शिकवत नसे, पण शिकावेसे वाटणारा शिकत असे. अभ्यासक्रम नव्हताच. कुणी काय नवीन वाचलं, काय नवीन पाहिलं, काय नवीन ऐकलं याच गोष्टी चालायच्या. गॉसिपिंग शून्य. अधून मधून फक्त चहाच. चहाच खाली रेघ. या शाळेत आम्ही आपापल्या कुवतीप्रमाणे नाटक शिकलो. नाटक म्हणजे केवळ गोष्ट सांगणं. ऐकणं, पाहणं नाही तर माणूस वाचणं, माणूस समजावून घेणं, माणसांचे गुंतागुंतीचे मनोव्यापार जाणून घेणं. कालानुरुप बदललेल्या संकल्पनांचा, समस्यांचा विचार करणं हे आम्हाला कळू लागलं. नाटकाचे म्हणून नियम असतात. नाटकातल्या वास्तवाला आणि काल्पनिकाला सीमा असतात, नाटकाचा म्हणून एक स्वतंत्र काळ असतो, स्वतंत्र क्षेत्रफळ असतं. खूप शिकायला मिळालं.

या शिकण्यातून आम्हाला माणसात रस वाटू लागला. सर्वत्र नाटक दिसू लागलं. वासुदेव, कडक लक्ष्मी, बहुरुपी, माकडवाले ही मंडळी, अगदी भिकारी सुद्धा नाटक करून पोटं भरताना दिसू लागली. दूरच्या नात्यातली वाटू लागली. कधी नाही तर त्यांचेही विचार मनात येवू लागले. एकदा लक्षात आले, माकडवाला माकडाला पोसत नाही, माकड त्याला पोसतं..... नाटक शोधताना अशा विचारांनी जगण्यात मौज वाटू लागली. दिवसभर प्रत्येकाच्या जगण्यात नाटकाचा एखादा प्रवेश असतोच असतो. लग्नाला पंचवीसच्या वर वर्षं झाल्यानंतरही नवरा बाय .. कौतुक करतो....नाटक असतं, पण ते केवढं तरी सुख निर्माण करतं संसारात......

लहान मुलंही नकळत अशा सुखासाठी, आनंदासाठी नाटक करतात. दाराआड लपून स्वत:ला शोधायला मोठ्यांना सांगतात.

नाटक ही सुंदर, निस्वार्थी, फसवणूक आहे, आयुष्यात रंग, रस, गंध भरणारी आपण पैसे भरून स्वत:ला फसवून घ्यायला नाट्यगृहात जातो.

नाटक केवळ रंगमंचावर होत नसतं. प्रेक्षक सुध्दा सहजपणे त्या नाटकात सामील होतो. नाटक अधिक रंगवत रहातो. स्वत:ला विसरून. काही काळ स्वत:ला विसरून जाणं ही देखील ध्यानधारणा असते. आपण प्रेक्षकांची दाद म्हणतो, खरं तर प्रेक्षकांचा तो नाटकाच्या खेळात सहभाग असतो. हा सहभाग लाभला की कलावंतांना परमोच कोटीचं सार्थक लाभतं. एका कलावंताचे हजार कलावंत होऊन ते हजार मनात स्थान पटकावतात.

कलावंत प्रेक्षकांचं देणं लागतात. देण ऋणको–धनकोच्या स्वरूपाचं नसतं. आईवडीलांचं किंवा समाजाचं देणं असावं तशा स्वरूपाचं असतं. त्यात धनाऐवजी कर्तव्य, आपुलकी, प्रेम अभिप्रेत असतं. हे देणं फेडण्याबाबत आजच्या तरुण कलावंतांना मला काही सांगावसं वाटतं. सांगितलं नाही तर एक नाट्यकर्मी म्हणून मला चुटपूट वाटेल. माझ्या सांगण्यातलं काही घ्यावसं वाटलं तर कलाकारांनी घ्यावं. घेतलं नाही तरी कालांतरानं त्यांना हे पुढल्या फळीला सांगावसं वाटेल. प्रेक्षकांपुढे येताना कलावंत हा प्रेक्षणीय असावा. आपलं व्यक्तिमत्व, आपला आवाज, त्यानं जपला पाहिजे. हिंदी चित्रपटातील कलावंत शरीरसौष्ठव राखण्याची काळजी घेतात. तशी त्यांनी घेतली पाहिजे. त्यातली जी पथ्ये आहेत, ती सांभाळली पाहिजेत.

आपला प्रत्येक प्रयोग हा आधीच्या प्रयोगापेक्षा अधिक ताजा, अधिक टवटवीत कसा होईल याची त काळजी घ्यायला हवी. प्रकृतीला झेपतील, सोसवतील एवढेच प्रयोग त्यांनी करावेत. ते प्रेक्षकांच्याच नाहीत तर त्यांच्या कुटुंबियांच्या सुध्दा हिताचे ठरेल.

समाजात वावरताना सामाजिक नियम पाळून कलेची, कलावंताची प्रतिष्ठा मलीन होणार नाही याबद्दल जागरुक रहावं. समाजाला आपल्याबद्दल कौतुक असते, आदर असतो, त्याला धक्का लागू देऊ नये. विष्णुपंत पागनीसांचा तुकाराम देवघरात लावला जातो इतकं समाज तुमच्यावर प्रेम करतो. रंगपटात सुद्धा शिवाजी धुम्रपान करताना दिसला तरी तो प्रेक्षकांच्या मनातून जातो. नटाला खाजगी आयुष्य असते हे समाज मान्य करतो, पण त्याच बरोबर ते चव्हाट्यावर आलेलं त्याला अमान्य असतं.

आणखी एक गोष्ट. प्राणीमात्राला वृद्धत्व जसं अटळ असतं, आणि ते स्वीकारावं लागतं, तसं लोकप्रियतेलाही वृद्धत्व अटळ असतं. खंत न करता ते स्वीकारावं. तरुणपणी भविष्यासाठी तरतूद करून ......एके काळचा लोकप्रिय हिंदी नट जॉनी वॉकर याला एकानं विचारलं,'आज तुमची लोकप्रियता उरलेली नाही. तुम्ही प्रेक्षकांच्या विस्मरणात जात आहात, याबद्दल तुम्हाला दु:ख, खंत.' प्रश्न संपण्याआधीच जॉनी वॉकरनं जे उत्तर दिलं ते प्रत्येक

क्षेत्रातल्या लोकप्रिय व्यक्तीनं लक्षात ठेवण्यासारखं आहे. तो म्हणाला, शेर्पा तेनसिंगनं एव्हरेस्टवर जाऊन झेंडा लावला, पण तिथं तो थांबला नाही. अशा शिखरावर थांबण्याइतकी जागाही नसते. तिथून त्याला खाली उतरावंच लागलं. अशा वेळी खंत करायची नसते. आपण आपल्या कुवतीप्रमाणे जास्तीत जास्त उंचावर जाऊन झेंडा रोवून आलो, या समाधानात उरलेलं आयुष्य काढायचं असतं!

नाटकाच्या यक्षभूमीची स्वप्नं पहाण्याचा तरुण पिढीला वयसिद्ध हक्क आहे. शाळा कॉलेजच्या स्नेहसंमेलनात त्यांच्या तोंडाला रंग लागतो. त्या रंगातच नाटकाची ओढ असते. कॉलेजमधली तरुण मंडळी एकत्र जमतात. नाट्यसंस्था स्थापन करतात. घरच्यांचा विरोध पत्करून, अभ्यास संभाळून विविध स्पर्धात भाग घेतात, त्या मध्ये हौस असते. हौस थोड्या दिवसांची असते, वेळ मात्र जाता जात नाही.

आजकाल या हौसेला पूरक अशा अनेक सुविधा उपलब्ध आहेत. नाट्य प्रशिक्षण वर्ग आहेत. नाट्य शिबीरे आहेत. बहुधा या मंडळींचं मुख्य ध्येय दिसतं ते राज्य नाट्य स्पर्धेत भाग घेण्याचं. या साठी ते जे करतात, त्याला ते नाट्य चळवळ म्हणतात. त्यांना खूप काही वेगळं करून दाखवायचं असतं. 'वेगळं' — म्हणजे काय? असं विचारल्यावर उत्तर बहुधा एकच असतं 'टोटली वेगळं' पण मग नाटकाची जुळवाजुळव करताना त्यांना आधी अडचणीच अडचणी दिसू लागतात. त्यांना पाहिजे तसं 'स्क्रिप्ट' मिळत नाही. तालमीसाठी जागेचा प्रश्न येतो. आणि पैशाची अडचण असतेच असते. शेवटी ते एखादं जुनंच नाटक घेऊन स्पर्धेत उतरतात.

या संदर्भात मी चौतीसेक वर्षांपूर्वीची आठवण सांगितली तर ती अस्थानी होऊ नये. तेव्हा शिबीर, चळवळ हे शब्द प्रचलित नव्हते. नाट्य स्पर्धेपूर्वी सहा सात महिने 'उदयकला केंद्रा'चे रमेश चौधरी त्यांच्या दोघाचौघा मित्रांना घेऊन माझ्याकडे आले. त्यांना स्पर्धेसाठी एक नाटक लिहून हवं होतं. त्या वेळी माझ्या डोक्यात एका लेखाचा विषय घोळत होता. तेव्हाच्या वर्तमानपत्रातल्या काही बातम्या वाचून. आणि त्याबद्दल मी बोलत असताना चौधरी म्हणाले, हा उत्तम विषय आहे. यावरच आपण नाटक करू. ते नाटक म्हणजे 'ग्रँड रिडक्शन सेल' नाटकात जवळजवळ पंचवीस पात्रे होती. माझ्या आणि उदयकला केंद्राच्या उत्साही मंडळीच्या चर्चा सुरु झाल्या. सर्वांच्या डोक्यातच नाहीतर अंगात ते नाटक भिनत होतं. तालमींना सर्व पात्रे काम असो, नसो, हजर असत– पु. भा. भाव्यांनी या नाटकाला आपण होऊन प्रस्तावना द्यायचं मान्य केलं. माझा तो सन्मान होता. स्पर्धेत नाटकाचा प्रयोग उत्तम झाला..... स्पर्धा संपल्यानंतर मंडळी नाटकात आपण कुठं कमी पडलो, स्पर्धेतली इतर नाटकं कशी झाली, त्यातून काय घेण्यासारखं होतं, या चर्चा करू लागली. महिनाभरानंतर पुढच्या वर्षीच्या नाटकाचे आराखडे आखू लागली. पेणच्या गणपतीच्या कारखान्यासारखी. तेव्हा नाट्य चळवळ हा शब्द नव्हता. पण ही चळवळ होती. नाटकाला पूरक अशी. पूर्वीचा गणपती उत्सव आणि दिवाळी अशीच असायची. त्यात क्षणीक आनंद नसायचा. दीर्घकाळ आठवणीत राहील असा अनुपम आनंद असायचा. तसाच आनंद ही नाटकवेडी मंडळी दोन्ही हातांनी लुटत होती.

आज गावोगावी स्थापन झालेल्या नाट्यसंस्था हा दीर्घकालीन आनंद लुटून नाट्यकलेत ओल्या चिंब होतात का? त्यांनी स्वतःला विचारण्याचा हा प्रश्न आहे. टोटली वेगळ्या नाटकाच्या संहितेसाठी ते किती धडपड करतात? संहिता मिळाली नाही तर आपल्याच संस्थेतल्या होतकरु, उत्साही लेखकाला नाटक लिहायला उद्युक्त करतात का? 'ललितकला साधना' या संस्थेनं असा प्रयोग करून मराठी रंगभूमीला सुरेश खरे हा नाटककार दिला आहे. त्या काळात शिबीरं वगैरे नसताना गावागावातही नाटकानी झपाटलेली तरुण मंडळी भेंड्यांच्या शाळेसारख्या शाळा भरवत. जिद्दीनं नाटकं बसवत. शाळेत येणारे शाळकरी फक्त नाटककार किंवा नट व्हायला येत नसत. शाम आडारकरासारखा नेपथ्यात रस घेत होता. कुणी प्रकाश योजनेत तर कुणी कशात. काही शाळकरी तर नाटक जाणून घ्यायला, पर्यायानं रसिक प्रेक्षक बनायला येत होते. आजही असे शाळकरी असतील, तर ती आनंदाची गोष्ट आहे.

आजच्या हौशी, चळवळी नाट्यकर्मीशी मला या निमित्तानं थोडा संवाद साधायचा आहे.

अंगात नाटक भिनवून घेण्यासाठी संहितेच्या चर्चेपासून ते नाट्य प्रयोग होऊन त्याच्यावर चर्चा होईपर्यंत सर्व संबंधितांनी त्यात सहभाग घेतला पाहिजे. या चर्चांमध्ये नकळत खूप शिकता येण्याची शक्यता असते. तालमी चालू

असताना सर्वांनी पूर्ण तालमीला हजर राहाणे तितकंच महत्वाचं आहे. त्यामुळे मिळालेल्या भूमिकेचा अधिक अभ्यास होतो. सर्व प्रकारच्या साहित्याचं वाचन नाटकासाठी प्रगल्भ बनवतं हे लक्षात ठेवलं पाहिजे. त्यातून भाषेविषयी प्रेम निर्माण होतं. मग शब्दाविषयी आपुलकी वाटायला लागते. त्यांची अधिक ओळख करून घ्यावीशी वाटते. त्यांचे शुद्ध उच्चार, नेमके अर्थ जाणून घेण्याची उत्सुकता लागते. शब्दांच्या श्रीमंतीचं तेज नसानसात शिरतं आणि आनंदाचे डोही आनंदतरंग अशी अवस्था होते. आपण अठराविश्वे दारिद्र्य म्हणतो. ती अठरा विश्वे कोणती? हे मनात येतं? ...... शिळोप्याच्या गोष्टी म्हणतो, 'शिळोपा' म्हणजे काय असा प्रश्न पडतो? 'अठरा विसवे' असा शब्द आहे ..... शिळोपा म्हणजे थंड वेळ, संध्याकाळ.... उपहार म्हणजे देणगी, भेट .... उपहार म्हणजे फराळ ..... विठ्ठलाची आरती म्हणताना 'दर्शन हेळा मात्रे' मधल्या हेळा चा अर्थ काय? ...... क्षण. आरतीवरून एक गंमत आठवली, ती सांगतो. गणपतीच्या आरतीत बरेच भक्त 'दर्शन मात्रे मान' असे म्हणतात.

मास्टर दत्ताराम सांगत, आम्ही मंडळी फारशी शिकलेली नव्हतो. तालीम मास्तर आम्हाला अगदी अ, आ, इ, ई पासून शिकवायचे. म्हणजे मेकअप केल्यानंतर कुणाशी बोलायचे नाही. आपल्याच भूमिकेचा विचार करत राहायचं. पोषाखाची कशी काळजी घ्यावी ..... पोषाख आधी कसा तपासावा, कुठंही बसताना ती जागा स्वच्छ आहे की नाही ते पाहावं, स्टेजवरही जागा बघून घ्याव्यात, धोतराची, पातळाची मागील बाजू नीट करून घ्यावी. प्रॉपर्टी तपासून घ्यावी. एंट्रीपूर्वी शरीरधर्म उरकावा. तहान भागवावी ..... एंट्रीपूर्वी पहिलं वाक्य स्वत:शी उच्चारावं वगैरे वगैरे. हे साधे, सोपे नियम आजही महत्वाचे आहेत. जुन्या कलावंतांची आत्मचरित्रं आजच्या मंडळींनी 'अभ्यास' म्हणून जरुर वाचावीत असं मला सांगावंसं वाटतं. उत्तमोत्तम नाटककारांची भाषा मुखोद्गत केल्यामुळे त्यांच्या चरित्रातील भाषाही आपल्याला मोहवून टाकते.

एक खेदाची गोष्ट मला नमूद करावीशी वाटते. हौशी कलावंतांत दूरदर्शनचे आकर्षण वाढत्या प्रमाणात आढळतं. दूरदर्शनच्या मालिकेत आणि तिथून नंतर चित्रपटात चमकण्यासाठी ते नाटकाचा शिडीसारखा उपयोग समजतात. पडद्यावरल्या ग्लॅमरचा त्यांना मोह पडतो. एकाच वेळी त्यांना ठिकठिकाणच्या लाखो प्रेक्षकांपुढे येता येतं. कष्टाच्या तालमी नाहीत, दौरे नाहीत, आणि पैसा भरपूर असं त्यांचं गणित असतं. याचा परिणाम मराठी नाटकांवर होतो. लहान लहान भूमिकेसाठी कलावंत मिळत नाहीत, मिळाले तर ते पहिल्या संधीला दूरदर्शनकडे पळतात. मग तारखा मिळण्याच्या अडचणी येतात. या मंडळींनी नाटकाची नाळ तोडू नये. नाटकाशी पूर्णत: फारकत घेऊ नये असं मला वाटतं. नाटकाच्या ओढीनं आवर्जून आलेल्या प्रेक्षकांपुढं नाटक करणं आणि दैनंदिन व्यवहार करता करता अधून मधून नाटक पाहाणाऱ्या आणि न दिसणाऱ्या घरबशा प्रेक्षकांपुढे नाटक करणं यातलं कुठलं नाटक आनंद देतं, समाधान देतं हे मी सांगण्याची गरज नाही. समोर श्रोते असताना बोलणं आणि समोर श्रोते असतील असं समजून बोलणं या दोन आनंदात महदंतर आहे. लहान मुलाबरोबर पत्त्याचा भिकार-सावकार डाव खेळणं आणि एकट्यानं भूतासारखा पेशन्सचा डाव खेळणं यातसुद्धा जमीन अस्मानाचा फरक आहे.

आपण मराठी माणसं शंकेखोर फार. आपल्याला प्रश्न पडल्याखेरीज जगल्यासारखं वाटतच नाही. ..... मराठी नाटकावर दूरदर्शनचं आक्रमण होईल का? मग मराठी नाटकाचं काय होईल ? आपण प्रश्न मांडतो. रसिकहो, असाच प्रश्न १९३१ साली सिनेमानं आपल्यापुढं ठेवला होता. तरी आज मराठी नाटक उभं आहे ना? जोपर्यंत मराठी नाटक हा जगण्यासाठी आवश्यक असा घटक आहे असं मराठी रसिक मानतात, जोपर्यंत या रसिकांपुढं नाटक करण्यासाठी मराठी नाटककार, कलावंत, निर्माते झटतात, तोपर्यंत मराठी नाटक होतच राहाणार आहे. किंवा साध्या घरगुती भाषेत सांगायचं तर जोपर्यंत मराठी भाषा अस्तित्वात आहे, तोपर्यंत मराठी नाटकाला कसलीही भिती नाही.

मराठी प्रेक्षक आणखी एक काळजी करतो, आजकाल सतत विनोदी नाटकं रंगभूमीवर येताना दिसतात. यापुढील काळात गंभीर, समस्याप्रधान, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय नाटकं येणारच नाहीत का? मित्रहो, आजचं सामान्य माणसाचं जगणं ताणतणावाचं, गांजलेलं आहे. ते ताणतणाव विसरण्यासाठी प्रेक्षक करमणूकीसाठी विरंगुळ्यासाठी विनोदी नाटकांना गर्दी करतोय हे लक्षात घेतलं पाहिजे. निसर्गाच्या आणि काळाच्याही नियमांनुसार

हरएक बाबतीत बदल अटळ असतो. प्रेक्षकांच्या अपेक्षेनुसार पुन्हा वेगळी नाटके रंगभूमीवर येतील.

आजही गंभीर समस्याप्रधान नाटके लिहिणारे समर्थ नाटककार आहेत, पण अशी नाटकं सादर करताना निर्मात्यांपुढं आर्थिक अडचणी असू शकतात. पण ज्या निर्मात्यांची तीन-तीन, चार-चार विनोदी नाटके चालू असतील त्यांनी एखादं गंभीर नाटक सादर करण्याचं जरूर धाडस करावं. त्यांचं धाडस सफल झालं तर इतर निर्मातेही तसं धाडस करायला धजतील. प्रेक्षकांना गंभीर नाटकांचीही भूक असते. त्या नाटकात प्रभावी, कणखर अशी एखादी व्यक्तिरेखा त्यांच्या दृष्टीला पडते. तिच्या दर्शनाने ते संतुष्ट होतात. जगण्याची सार्थकता त्यांना जाणवते. नाटक संपल्यानंतर घरी जाताना ते अशी एखादी व्यक्तिरेखा आपल्याबरोबर घरी घेऊन जातात. तिच्या विचारात ते दिवस नि दिवस रंगतात. नाटककाराचं भाषावैभव आठवत राहतात. नाटकाची पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचत राहतात. विनोदी नाटकं पाहिल्यावर त्यांना रंगमंचावरील पात्रं रंगमंचावर ठेऊन एकट्यानंच घरी जावं लागतं म्हणून त्यांना भाषाशैलीने नटलेली समस्याप्रधान नाटकं संख्येनं कमी आहेत याची खंत वाटते.

नाटक ही मध्यम वर्गीयांची आवश्यक अशी चैन आहे. गेली काही वर्षं नाटकाच्या तिकीटाचे दर बघता बघता .त आहेत. हे दर असेच जर भरमसाठ वाढत राहिले तर ही चैन करता येईल का? हा सुद्धा त्यांच्यापुढे प्रश्न आहे.याबद्दल विचार केला तर एक भिती मनात उभी राहते. कालांतरानं प्रेक्षक नाटकाकडे वळेनासेच झाले तर काय स्थिती ओढवेल? नाटकावरच पोट अवलंबून असलेल्या रंगपटातील मंडळींच्या संसारांना याची झळ लागली तर?

वाढत्या दराला असं एक उत्तर दिलं जातं की प्रत्येक बाबतीत महागाई वाढली आहे. आज कुठली गोष्ट स्वस्त आहे? प्रेक्षकांना हे पटतंय, पण ...... असं आहे, सोन्याचे भाव कितीही कडाडले, तरी त्याबद्दल ते काळजी करत नाहीत, पण दुधाचे भाव भरमसाठ वाढले तर ते अस्वस्थ होतात. यात काय ते समजून घ्यावं.

याला एक मार्ग असू शकतो. निर्माते, कलावंत, नाट्यगृहांचे चालक, प्रेक्षकांचे प्रतिनिधी आणि त्यांच्या सोबतीला एखादा अर्थतज्ञ अशा मंडळींना एकत्र येऊन ही समस्या सोडवावी.

जाता जाता एक घटना नमूद करावीशी वाटते. आय.एन. टी. नं 'हवा अंधारा कवडसा' हे नाटक फक्त तीन, दोन, एक या दरानं प्रेक्षकांपुढे सादर केलं होतं. त्याला मुळीही प्रतिसाद मिळाला नव्हता. या नाटकाच्या परिक्षणात माधव मनोहर यांनी 'सोबत'च्या अंकात एक शेरा मारला होता. हे नाटक एवढ्या स्वस्त दरात दाखवूनही प्रेक्षक त्याकडे वळत नसतील तर त्यांना करंटेच म्हटलं पाहिजे!

नाटकाचं वेड महाराष्ट्रात सर्वत्र पसरलं आहे. लहान मोठ्या गावी समर्थ रंगकर्मी आहेत. त्यांची एक तक्रार असते, पुण्या-मुंबईच्या व्यावसायिक नाटकात त्यांना प्रवेश मिळत नाही. मुंबईशी संबंध आल्याशिवाय प्रतिष्ठा, लोकप्रियता लाभत नाही, असा एक समजच झाला आहे. गावोगावीच्या दुकानांची नावं बघा! 'बॉम्बे स्टोअर्स' 'बॉम्बे टेलर्स' अगदी 'बॉम्बे कोल डेपो' सुद्धा!..... याला मार्ग स्थानिक मंडळींनी शोधायचा आहे. त्यांनी समर्थ नाटक निर्माण केलं तर सबंध महाराष्ट्रातील रसिक ते डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाहीत. त्यातून आणखी मोलाचा फायदा असा की नागरी मध्यमवर्गीय विषयांपलिकडील बहुजन समाजाच्या समस्यांची ओळख करून देणारी नाटके रंगभूमीवर येतील. मराठी रंगभूमी अधिकच समृद्ध होईल. गेल्या काही वर्षात मराठी कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्रे यात बहुजन समाजानं जशी लक्षणीय भर टाकून मराठी साहित्य संपन्न केलं आहे, तसंच मराठी नाटकही संपन्न व्हावं अशी माझी अपेक्षा आहे. यासाठी मराठी नाट्य परिषद आपल्याला सहकार्य देईल असं मी संमेलनाध्यक्ष या नात्यानं सांगतो.

या वर्षात संमेलनाध्यक्षाकडून परिषदेनं काम करून घ्यावं अशी मी विनंती करतो. शोभेचा संमेलनाध्यक्ष होणं मला आवडणार नाही. परिषदेकडे रंगकर्मींसाठी काही योजना आहेत. त्या राबवून घेतल्या जातील याची मी जबाबदारी घेईन.

परिषदेनं वृद्ध, विकलांग, नाट्यकर्मींसाठी निवृत्ती वेतनाची योजना आखली आहे. त्यासाठी निधी गोळा करण्यास कार्यकर्त्यांनी सुरुवातही केली आहे. अनेक नाट्य रसिक, दाते त्याला चांगला प्रतिसाद देत आहेत. मी आपणा सर्वांना विनंती करतो की आपणही सढळ हातांनी शक्य तेवढी मदत या निधीला करावी.

शासनाकडूनही परिषदेला सहकार्य हवे आहे.

वृद्ध रंगकर्मींना दरमहा देण्यात येणाऱ्या मानधनाची रक्कम आज वाढवण्याची आज गरज आहे. अशा रंगकर्मींची यादी पुनर्निरीक्षणासाठी परिषदेकडे देण्यात यावी. या मानधनासाठी येणारे नवीन अर्जही छाननीसाठी परिषदेकडे प्रथम यावेत. शासनाचे तेवढंच काम आपोआप कमी होईल.

आमदार, साहित्यिक यांच्याप्रमाणेच मराठी रंगकर्मींसाठी शासनाने भूखंड मंजूर करावा. पुण्यामुंबईसाठीच नाही तर महाराष्ट्रभर ठिकठिकाणी भूखंडावर सहकारी संस्थांमार्फत बांधणी, निवासाचे क्षेत्रफळ, त्याचं वाटप हा सर्व कारभार पारदर्शकतेच्या अपेक्षेनं परिषदेकडं सोपवावा.

दहा टक्के शासकीय कोट्यातून ज्यांना जागा मंजूर झाल्या आहेत, त्यांना त्या त्वरीत मिळतील याकडे शासनाने लक्ष द्यावं. असाध्य रोगपिडीत रंगकर्मींना औषधोपचारासाठी शासनाने आर्थिक मदत द्यावी. त्यांना रुग्णालयात त्वरीत दाखल करून घेतलं जाईल आणि रुग्णालयात त्यांना मोफत औषधोपचार केला जाईल याचीही व्यवस्था करावी.

२७ ऑगस्ट २००४ ला नाट्य परिषदेला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्रात परिषदेच्या एकूण ४१ शाखा आहेत. या शाखांना नाममात्र भाड्यानं पाचशे ते सहाशे चौरस फूटांची कार्यालयासाठी जागा देण्यात यावी.

पिंपरी चिंचवड आणि नाशिक येथील नगरपालिकांनी दरमहा एक रुपया भाड्यानं जागा दिलेल्या आहेत. बोरिवलीची शाखा सर्वात मोठी, जास्तीत जास्त कार्य करणारी. ही शाखा आज भरमसाठ अशा भाड्याच्या मागणीनं संत्रस्त झाली आहे. या बाबतीतही शासनानं लक्ष घालावं.

परिषदेच्या या जन्मशताब्दि वर्षात मुंबईच्या यशवंतराव चव्हाण नाट्य संकुलाचं काम पूर्ण होण्यासाठी शासनानं आवश्यक ते आर्थिक सहाय्य देण्याचं, यशवंतरावांच्या या गावी आश्वासन द्यावं अशी आमची कळकळीची विनंती आहे. दोन कोटीपर्यंतची रक्कम परिषद जमविल.

रसिकहो, मराठी माणूस आहे तोवर मराठी भाषा राहाणार आहे. मराठी भाषेबरोबर मराठी साहित्य आणि मराठी नाटकही राहाणार आहे. कारण अस्सल मराठी माणसाची नाळ नाटकाला जोडलेली असते. मराठी नाटकामध्ये आपण अनेक प्रवाहांना, मराठीच्या विविध बोली भाषांना सामील करून घेतलं तर मराठी नाट्यप्रेमाचा विस्तारच विस्तार होईल. तो विस्तार नव्या पिढ्यांना खुणावत राहील, बोलावत राहील याबद्दल विश्वास व्यक्त करून मी आपली रजा घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय मराठी.